**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१**
**जाहिरात क्रमांक १/२०१८**

महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे/ कोकण/ नागपूर/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती विभागातील रचना सहायक (गट-ब) (अराजपत्रित) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या http://ese.mah.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | ११/०४/२०१८ ते ०२/०५/२०१८ |
| २ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | १२/०५/२०१८ ते ०९/०६/२०१८ |
| ३ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | ०९/०६/२०१८ |

**माहिती स्त्रोत**

| हेल्प लाईन क्रमांक | **माहितीकरिता संकेतस्थळ** |
|---|---|
| **1800-3000-7766** | **https://www.mahapariksha.gov.in** |

❖ **रिक्त पदांचा तपशील : संवर्ग - रचना सहायक (गट-ब) (अराजपत्रित)**
**वेतनश्रेणी : वेतनबँड रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु. ४३००/-**

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३० टक्के | खेळाडू ५ टक्के | अनाथ मुले १ टक्का | |
| **१.** | **२.** | **३.** | **४.** | **५.** | **६.** | **७.** |
| १. | अनुसूचित जाती | ४९ | १५ | ०२ | ०० | ३२ |
| २. | अनुसूचित जमाती | ३० | ०९ | ०२ | ०० | १९ |
| ३. | विमुक्त जाती (अ) | १३ | ०४ | ०१ | ०० | ०८ |
| ४. | भटक्या जमाती (ब) | ०५ | ०१ | ०० | ०० | ०४ |
| ५. | भटक्या जमाती (क) | १२ | ०४ | ०१ | ०० | ०७ |
| ६. | भटक्या जमाती (ड) | ०७ | ०२ | ०० | ०० | ०५ |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | ०६ | ०२ | ०० | ०० | ०४ |
| ८. | इतर मागास वर्ग | ७४ | २२ | ०४ | ०० | ४८ |
| ९. | खुला | १९७ | ५९ | १० | ०२ | १२६ |
| | **एकूण** | **३९३** | **११८** | **२०** | **०२** | **२५३** |

**टिप :** १) वरील राखीव/बिनराखीव पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करुन पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

२) उपरोक्त ३९३ रिक्त पदांपैकी १४ पदे ही अपंगांच्या, एका पायाने अधू (OL-One Leg Affected) /श्रवणदोष (HH- Hearing Handicapped) या प्रवर्गासाठी आरक्षित असून सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.

❖ **सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता -**

| अ.क्र | पद | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | रचना सहायक/ कनिष्ठ अभियंता (गट-ब) (अराजपत्रित) | स्थापत्य अभियांत्रिकी किंवा स्थापत्य आणि ग्रामीण अभियांत्रिकी किंवा नागरी व ग्रामीण अभियांत्रिकी किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान या मधील मान्यताप्राप्त संस्थेची, तीन वर्षाची पदविका किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक. |



Scanned by CamScanner

- उमेदवारांकडे उक्त पदासाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किमान शैक्षणिक अर्हता प्राप्त असणे आवश्यक आहे.

❖ **वयोमर्यादा :-**

१) उक्त पदासाठी अर्ज करणा-या उमेदवाराचे अर्ज करण्याच्या दिनांकास किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी / खेळाडूंसाठी वयोमर्यादा ०५ वर्षे शिथिलक्षम राहील. तथापि खेळाडूंसाठी वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथील करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल.) तसेच अपंग उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

२) अगोदरच शासनाच्या सेवेत असणा-या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा दहा वर्षानी शिथील राहील.

❖ भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

❖ स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

| | |
|---|---|
| (सं.बा.सावजी) | (नो.र.शेंडे) |
| सदस्य सचिव, | अध्यक्ष, |
| राज्यस्तरीय निवड समिती, पुणे | राज्यस्तरीय निवड समिती |
| तथा | तथा |
| उपसंचालक,नगर रचना, | संचालक, नगर रचना, |
| मुख्य कार्यालय,पुणे | महाराष्ट्र राज्य, पुणे. |



Scanned by CamScanner

## नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

रचना सहायक (गट-ब) (अराजपत्रित) पदासाठी
करावयाच्या अर्जासोबतचे **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** माहितीपत्रक

### (अ) अर्ज करण्याची पद्धत

कृपया सगळ्या सूचना वाचा आणि मगच अर्ज भरा.

**सूचनाः**

रचना सहायक-२०१८ चे अर्ज भरण्याबाबत सूचना
अर्जामध्ये खालील टप्पे आहेतः

१. नोंदणी
२. अर्जावरील माहितीचे पूर्वावलोकन
३. ऑनलाईन शुल्क भरणा
४. अर्जाची प्रिंटआऊट

### १. कृपया अर्जासंबंधी खालील सूचना पहा

उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल.उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल.

१) उमेदवाराचे नाव, वडिलांचे/पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.

२) छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती :

अ. कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी 200 पिक्सल असलेले छायाचित्र स्कॅन करून अपलोड करावे. छायाचित्राचे आकारमान 20 केबी ते 50 केबीच्या दरम्यान असावा.

आ. 5x4.5 सेमीचा एक आयत काढा. त्या आयतामध्ये स्वाक्षरी करावी. ती प्रतिमा स्कॅन करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची 60 पिक्सल आणि रुंदी 140 पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ केबी ते 50 केबीच्या दरम्यान असावे.

३) पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरूपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफीस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. सहित माहिती भरावी.

४) त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने/तिने आपला जात प्रवर्ग निवडावा. तसेच उमेदवारास त्याचा धर्म, नॉन – क्रीमिलेयर प्रमाणपत्र आणि उमेदवार हा सरकारी कर्मचारी आहे किंवा नाही याबद्दलची माहिती द्यावी लागेल .

५) ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी. उमेदवाराकडे आधार क्रमांक नसल्यास त्याने/तिने आधारकरिता नोंदणी करून त्यांचा आधार नोंदणी क्रमांक द्यावा.

६) उमेदवारांना अपंग आणि इतर आरक्षणांचा पर्याय पण दिलेला आहे.

७) फक्त महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत.

८) शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. पदवी कोणत्या विद्यापिठातून घेतली, मिळालेले गुण, कमाल गुण, उत्तीर्ण झालेले वर्ष, विद्यापीठाचे नाव इ. माहितीसुद्धा भरण्यात यावी. त्यानुसार टक्केवारी काढली जाईल.

९) एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदारास **पुढे** या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदारांकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील **संपादित** करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१०) त्यानंतरचा अर्ज प्रत्येक विभागानुसार आवश्यक त्या माहितीनुसार भरून घेतला जाईल. उमेदवाराला त्यानुसार माहिती द्यावी लागेल.

११) पुढे जाण्यासाठी अर्जदाराला **परीक्षा दाखवा** ऑप्शन वर क्लिक करावे लागेल. पुढे अर्जदाराने अर्ज करण्यासाठी “रचनासहायक- २०१८" हा पर्याय निवडणे आवश्यक आहे त्यानंतर त्यास प्रोसिड या बटनावर क्लिक करावे लागेल.

१२) जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे पदविका / पदवी / पदुत्तर पदवी व्यावसायिक पात्रता असणारे उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत.

१३) व्यावसायिक पात्रता मध्ये, अर्जदार व्यावसायिक शिक्षण असल्यास त्याबद्दल माहिती भरू शकतो.

१४) उमेदवार नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो.

१५) ह्यानंतर उमेदवाराने नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ऑनलाइन शुल्क भरावे.

१६) उमेदवाराने सगळ्या नियम व अटी वाचून मान्यता दर्शवण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे.

१७) मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल.

१८) उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल.

२. **अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:**

अ. युजरनेम आणि पासवर्ड वापरून लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.
आ. अर्ज प्रिंट करण्यासाठी "प्रिंट प्रिव्ह्यू" या पर्यायावर क्लिक करा.

३. **ऑनलाईन भरणा:**

उमेदवार क्रेडिट कार्ड/ डेबिट कार्ड/एटीएम पिन/इंटरनेट बँकिंग/वॅलेट/कॅश कार्ड/आयएमपीएस द्वारे शुल्क भरणा करू शकतात.

अ. उमेदवार आपापल्या सोयीनुसार भरणा करू शकतात.
आ. भरणा करण्याकरिता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहेत.
इ. उमेदवाराला जर वीज पुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडित झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही तर त्याने पुन्हा लॉगइन करून भरणा प्रक्रिया पूर्ण करावी.
ई. शुल्क भरणा झाल्यावर उमेदवाराला "भरणा यशस्वी" म्हणून संदेश मिळेल आणि झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती अर्जामध्ये आपोआप येईल.

४. **अर्जाची प्रिंट**

अ. उमेदवाराने अर्जाची एक प्रत आपल्याकडे ठेवावी.
आ. अर्ज संबंधित विभागाकडेजमा करण्याची आवश्यकता नाही.

**महत्त्वाचे:**

जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल. कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयांबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर १८०० ३००० ७७६६ वर कॉल करा.

नोंद : नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव, ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण), पसंतीचे स्थान, जन्मतारीख इत्यादि फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

५. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतीम तारखेस रात्री १२.०० वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

(ब) **अर्जदारांसाठी महत्त्वाच्या सूचना :-**

१. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना, शैक्षणिक प्रमाणपत्रे/ अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चूका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली गेल्यामुळे भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी काळजीपूर्वक भरावी. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

२. ऑनलाईन अर्ज प्रक्रीयेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/ परीक्षाकेंद्र/ बैठक क्रमांक इ.बाबतची माहिती वर दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध राहिल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. उमेदवाराला परीक्षा तसेच कागदपत्र पडताळणीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. सदरहु ऑनलाईन परीक्षेचे आयोजन महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये केले जाईल.

३. उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरी त्यांनी या पदाच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहित ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

४. उमेदवारांची अंतिम निवड ही ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल. मात्र उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ही त्यांनी अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणत्याही कागदपत्रांची पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहाणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण पडताळणीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर प्रक्रीयेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५. ऑनलाईन परीक्षा एकूण २०० गुणांची (प्रत्येकी २ गुणांचा एक प्रश्न याप्रमाणे १०० प्रश्न) घेतली जाईल. त्यापैकी तांत्रिक प्रश्नांसाठी ११० गुण व मराठी + इंग्रजी + सामान्यज्ञान यासाठी ९० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. सदर लेखी परीक्षा ही रचना सहायक पदासाठी निश्चित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेशी संबंधित अभ्यासक्रमावर आधारित तसेच संगणकावर आधारित (Computer based) व २ तासांची असेल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाची असेल. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. प्रत्येक योग्य उत्तरासाठी २ गुण व प्रत्येक चूकीच्या उत्तरासाठी १ गुण वजा याप्रमाणे परीक्षेमध्ये नकारात्मक गुणपद्धत (निगेटिव्ह मार्किंग) अवलंबिली जाईल. समान गुण मिळालेल्या उमेदवारांबाबत शासनाने वेळोवेळी निर्गत केलेल्या सूचनांच्या आधारे निर्णय घेण्यात येईल.

६. पात्र उमेदवारांचा अंतिम निकाल वरील संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

७. महिला व बाल कल्याण विभाग शासन निर्णय, क्रमांक८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यात आलेले आहे. महिला उमेदवार

उपलब्ध न झाल्यास पुरुष उमेदवारांचा विचार केला जाईल. खुला, इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) तसेच भटक्या जमाती (ड) प्रवर्गातील उमेदवारांनी महिलांसाठीच्या राखीव पदाकरीता अर्ज करताना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम अधिका-याचे सन २०१७-१८ चे मूळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

८. निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दि.७ जुलै, २००७ मधील नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

९. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ अनुसार प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा (अ), भ.ज (ब), भ.ज (क), भ.ज (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याचे सन २०१७-१८ चे मूळ नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

१०. खेळाडूंसाठी असलेले समांतर आरक्षण, शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१ जुलै २०१६ मधील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील. त्यांचेकरीता उच्च वयोमर्यादा कमाल ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. तथापि वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथिल करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल. खेळाडू उमेदवाराकडे अर्ज करतेवेळी विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक राहिल. सदर पदासाठी उक्त शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मधील गट-अ तसेच गट-ब साठी पात्र क्रीडा स्पर्धा विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू पात्र ठरेल.

११. शासन, सामान्य प्रशासन विभाग, पूरकपत्र क्र.प्रानिमं-१२१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दि.५/१०/२०१५ मधील तरतूदींनुसार, लेखी परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करताना त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यांस प्रथम प्राधान्यक्रम देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवाराकडे अर्ज करतेवेळी, संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास "कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य" म्हणून पात्र ठरविल्याबाबतच्या पत्राचा क्रमांक व दिनांक असणे आवश्यक राहील. सदरहु मूळ पत्र उमेदवाराने कागदपत्र पडताळणीचे वेळी पडताळणी समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

१२. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २/४/२०१८ मधील तरतूदींनुसार, अनाथ मुलांसाठी असलेल्या राखीव पदासाठी अर्ज करताना उमेदवाराकडे, महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील. सदरहु मूळ प्रमाणपत्र उमेदवाराने कागदपत्र पडताळणीचे वेळी पडताळणी समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

१३. अपंग उमेदवारांच्या बाबतीत, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.न्यायाप्र-२०११/ प्र.क्र.४/सुधार-३, दि.१७ मार्च २०११ मधील तरतूदींनुसार, अपंग उमेदवाराकडे शासन निर्णयात नमूद उपकरणासह कार्यरत राहाण्याची क्षमता असणे आवश्यक आहे.

१४. उमेदवार हा भारताचा नागरीक असावा तसेच तो महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा व त्याबाबतचे प्रमाणपत्र त्याच्याकडे असणे आवश्यक राहील. तसेच त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१५. उमेदवारास परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहाणार नाहीत. छाननीच्या वेळी सदर उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून वगळण्यात येईल.

१६. निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्र छाननीच्या वेळी, पडताळणी समितीकडे खालील मूळ प्रमाणपत्रांसह त्याच्या साक्षांकित छायाप्रती दोन प्रतीत सादर करणे बंधनकारक राहील.

क) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र -शासनमान्य संस्थेने निर्गमित केलेले प्रमाणपत्र
ख) अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) – शासन/खाजगी संस्थेने निर्गमित केलेले प्रमाणपत्र
ग) अधिवास प्रमाणपत्र - महाराष्ट्र राज्यात वास्तव्य असल्याबाबतचे महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र
घ) जन्मतारखेबाबत - जन्म नोंदीचा दाखला किंवा माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र/ एस.एस.सी. गुणपत्रिका व प्रमाणपत्र
च) जात प्रमाणपत्र - राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र
छ) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास) - जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र
ज) नॉन क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र - खुल्या प्रवर्गातील महिला तसेच असे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल अशा प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सध्या वैध असलेले सक्षम प्राधिका-याकडील सन २०१७-२०१८ चे प्रमाणपत्र
झ) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र - विवाहित उमेदवारांसाठी नमुना-अ मध्ये सादर करणे.
ट) खेळाडूबाबतचे प्रमाणपत्र - विभागीय क्रिडा उपसंचालक यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र
ठ) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य असल्याबाबतचे पत्र - संबंधित जिल्हास्तरीय समितीने निर्गमित केलेले पत्र.
ड) अनाथ मुलांबाबतचे प्रमाणपत्र - महिला व बाल विकास विभागाकडून निर्गमित केलेले प्रमाणपत्र
ढ) अपंगत्वाचे प्रमाणपत्र – संबंधित जिल्हा शल्य चिकित्सकाने निर्गमित केलेले प्रमाणपत्र

याव्यतिरिक्त वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन आदेशानुसार अन्य प्रमाणपत्रांची आवश्यकता भासल्यास ती पुरविण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारावर राहिल.

१७. विहित वयोमर्यादेतील शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या मान्यतेने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे. याबाबतची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

१८. उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या निवडी संबंधात कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

**(क) इतर सर्वसाधारण सूचना :-**

१) रचना सहायक या पदावर निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्रातील कोकण/ नाशिक/ पुणे/ औरंगाबाद/ अमरावती/नागपूर विभागात नियुक्ती देण्यात येईल.

२) अर्ज केल्यानंतर पुढील निवड प्रक्रियेला विशिष्ट कालावधी लागणार असल्यामुळे प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्याबाबत कुठलीही चौकशी (मौखिक अथवा लेखी) किंवा दूरध्वनीद्वारे करु नये.

३) वरील पदांवर शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांची महाराष्ट्र राज्यात नगर रचना संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयात तसेच महानगरपालिका/नगरपरिषदा/ नगरपंचायती/ विकास प्राधिकरणे/नवनगर प्राधिकरणे/ शासनाची इतर प्राधिकरणे यापैकी कोठेही नियुक्ती/ बदली होऊ शकेल.

४) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे अर्जदारास लेखी परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे, असे असणार नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे आढळल्यास, खोटी कागदपत्रे दिल्याचे आढळल्यास त्याची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्दबादल होईल.

५) निवड प्रक्रीयेसंदर्भात शासन/ न्यायालयाचे निर्णय सर्व उमेदवारांवर बंधनकारक राहातील. कोणत्याही अपरिहार्य कारणास्तव भरती/ निवड प्रक्रीया स्थगित/ रद्द करण्याचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी/ राज्य निवड समितीने राखून ठेवले आहेत.